Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -305 | TUESDAY DT.06 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०५ | मंगळवार,दि.०६ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रू | । पाने ४

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

आमिषाचे फळ वाईटच; आमिषापोटी १२ लाखांचा ऑनलाईन गंडा

बीड /प्रतिनिधी

एकीकडे जास्त व्याजदराच्या आमिषापोटी बीड शहरासह जिल्हाभरातील नागरीकांचे कोट्यवधी रुपये मल्टिस्टेट आणि क्रेडीट सोसायटीमध्ये अडकलेले असताना दुसरीकडे जादा परताव्याच्या आमिषाला आणखी लोक बळी पडत असून शेअर मार्केटमध्ये जादा परतावा देतो, म्हणून सेकवॉ या शेअर मार्केट कंपनीने केज येथील शिक्षकाला तब्बल ११ लाख ९ हजार ५०० रुपयांना गंडवल्याचे उघडकीस आले आहे तर अन्य एका सायबर गुन्ह्यात गेवराई तालुक्यातील तळेवाडी येथील ३६ वर्षीय इसमास ९९ हजार ९९९ रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. या दोन्ही प्रकरणात बीड सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.केज शहरातील विठाईपुरम भागात राहणारे ४० वर्षीय शिक्षक सेनल महेंद्र मिश्रा हे गेल्या काही दिवसांपूर्वी फेसबुक ही सोशल साईट पहात असताना त्या साईडवर सेकवॉ शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनीची जाहीरात दिसून आली. त्यावर त्यांनी क्लिक करत संबंधितांशी संपर्क साधला असता त्यांनी मिश्रा यांना वॉटस्ॲप ग्रुपमध्ये ॲड केले आणि शेअर मार्केटमध्ये जास्त नफा मिळवून देतो म्हणत गुंतवणूक करण्याचे आमिष दाखविले. या वेळी संबंधित सेकवॉ कंपनीकडून ५ मोबाईल क्रमांकाद्वारे पैसे मागण्यात आले. विविध बँक खात्यावर संबंधित शिक्षकाने तब्बल ११ लाख ९ हजार ५०० रुपये भरणा केला. मात्र काही दिवसानंतर सदरील शिक्षकास आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी बीड सायबर पोलिसात याबाबत तक्रार दिली. तेव्हा सायबर पोलिसांनी शिक्षक सेनल महेंद्र मिश्रा यांच्या फिर्यादीवरून संबंधित पाच मोबाईल नंबर व सेकवॉ शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनी चालकाविरुद्ध गु.र.नं. ०५/२०२४ कलम ४२०, ३४ भा.दं.वि.सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० कलम ६६, ६६ क, ६६ ड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला तर दुसरी ऑनलाईन फसवणूक गेवराई तालुक्णयातील तळेवाडी येथील लक्ष्मण लहूराव सजगणे यांची झाली. त्यांच्या बँक खात्यातून अज्ञाताने ९९ हजार ९९९ रुपये काढून फसवणूक केली. या प्रकरणी लक्ष्मण सजगणे यांच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरुद्ध गु.र.नं. ६/२०२४ कलम ४२० भा.दं.वि.सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६६ ६६सी अन्वये दाखल करण्यात आला आहे. तर तिसरी ऑनलाईन फसवणुकीची घटना बीड शहरात उघडकीस आली. शहरातील स्वराज्य नगर भागात सलुनचा व्यवसाय करणारे शंकर सुभाष गवळी यांना अज्ञाताने बिझनेस लोन, मुद्रा लोन करून देतो, असे सांगून वारंवार त्यांच्याकडून ऑनलाईन फसवणूक करत ८१ हजार रुपये लुबाडले. या प्रकरणी गवळी यांच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरोधात सायबर क्राईममध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केज तालुक्यातील लव्हुरी येथे हळदी कुंकूवाच्या कार्यक्रमात विधवा महिलांना साड्या वाटप

केज / प्रतिनिधी

केज तालुक्यातील लव्हुरी येथे हळदी कुंकूवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात विधवा महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, केज तालुक्यातील लव्हुरी येथे दि.२६ जानेवारी रोजी ग्रामपंचायतच्या सदस्या निर्मला जाधव यांनी ग्रामसभेत ठराव मांडून विधवा महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम ठेवण्याचा प्रस्ताव सादर केला.या प्रस्तावाला सर्व सदस्य व गावातील लोकांनी सहमती दर्शवून हा कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लव्हुरी गावचेप्रथम नागरिक सरपंच पंडित चाळक हे होते तर या कार्यक्रमाचे आयोजक , निर्मलाताई जाधव, सौ.शिवानीताई जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी नवचेतना संस्थेच्या वतीने व ग्राम पंचायतच्या मार्गदर्शना खाली विधवा महिलांना मानसन्मान भेटत नाही अशा महिला निराश होतात व विधवा महिलां स्वतःचे दुःख विसरून जाव्यात म्हणून अशा पद्धतीने आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला आहे.यावेळी नवचेतनाच्या अध्यक्षा मनीषाताई घुले यांनी बोलताना असे सांगितले केले की,विधवा महिलांना सर्व कामे करता येतात मग हळदीकुंकू व मंगळसूत्र व इतर अलंकार परिधान करण्याचा अधिकार का नाही?

बाळशास्त्री जांभेकर यांचा वसा आणि वारसा घेऊन सुरू असलेल्या पत्रकारिता क्षेत्रातील माझ्या कार्याचे मराठी पत्रकार परिषद शाखा अंबेजोगाई यांनी दखल घेऊन दरवर्षी दर्पण व मूक नायक दिनाचे औचित्य साधून देण्यात येणारा सन २०२४ चा स्व. मुश्ताक हुसेन स्मृती पत्रकारिता पुरस्कारने नितीन चव्हाण दैनिक उपसंपादक यांचा गौरव केला. यावेळी पुरस्कार वितरण करतांना अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष पापा मोदी, दूरदर्शनचे अरुण समुद्रे, विशाल साळुंके सर, सुभाष चौरे सर, रवी उबाळे सर, जितेंद्र सिरसट सर, अनिल वाघमारे सर यांच्या सह अंबाजोगाईचे दत्ता आंबेकर, गजानन मुडेगावकर आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. यावेळी माझे सचिन जाधव, बंटी देशमुख, अशोक पवार, अनिल पवार, देवीदास जाधव यांच्या उपस्थित होते. मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई यांनी केलेल्या माझ्या सन्मानाबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

जोगाई सभामंडप लेणी संरक्षित स्मारकास अडीच कोटी रुपये मंजूर

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

मराठवाडा विकास कामाबाबत राज्य मंत्रीमंडळाची विशेष बैठक छत्रपती संभाजीनगर येथे दि.१६.०९.२०२३ रोजी पार पडली. त्यामध्ये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये मराठवाडा विभागातील ऐतिहासिक वास्तुचे संवर्धन करण्याचा समावेश करण्यात आला असून विशेषतः अंबाजोगाई येथील प्राचीन वास्तुस्थळाचा विकास करण्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अंबाजोगाई येथील जोगाई सभामंडप लेणी (हत्तीखाना) या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्ती कामाचे परिचय आर्किटेक्टस्, अंबाजोगाई यांनी तयार केलेले सविस्तर अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरीता संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी सादर केले आहे. त्यानुसार जोगाई सभामंडप लेणी (हत्तीखाना) अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाच्या सुमारे अडीच कोटी रुपये कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे बाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे

जोगाई सभामंडप लेणी (हत्तीखाना) अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाच्या रु.२,४९,८४,४६५/- (अक्षरी रुपये दोन कोटी एकोणपन्नास लक्ष चौऱ्याऐंशी हजार चारशे पासष्ट मात्र) (वस्तु व सेवाकरासह) या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी मागणी क्र. झेडडी-०२, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, २२०५ कला व संस्कृती (००) १०३, पुरातत्वशास्त्र, (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक संरक्षण (कार्यक्रम) (२२०५ १३०२) २७ लहान बांधकामे या लेखा शिर्षातील त्या त्या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.,संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ुगरहरीरीहीर.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२०५१२५३१६७६२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

सोलापूरच्या जलतरण तलावातील घटना

सहलीला गेलेल्या गेवराईतील शाळकरी मुलीचा मृत्यू

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई शहरातील जातेगाव रोडवर असलेल्या न्यु इरा इंग्लिश स्कुल या शाळेची सहल धार्मिक व पर्यटन स्थळी भेट देण्यासाठी दोन दिवसापुर्वी गेली होती. या सहलीतील एक तिसरीत शिकणारी प्रांजल नितीन पंडीत वय ७ वर्ष रा.केशवराज मंदिर जवळ, मोटेगल्ली गेवराई ही देखील पाण्याचा आनंद घेण्यासाठी पाण्यात गेली असता तिच्या नाकातोंडात पाणी गेल्याने अथवा तिने काही पदार्थ खाल्ल्यामुळे तिची पोटातील उलटी घशातच आडकल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना रविवार रोजी दुपारी घडली . तिच्या मृत्युची वार्ता गेवराई शहरात वाऱ्यासारखी पसरताच सर्वज हळहळ व्यक्त केली जात आहे.प्रांजल शहरातील जातेगाव रोडवर असलेल्या न्यु इरा इंग्लिश स्कुल या शाळेत तिसरीच्या वर्गात शिक्षण घेत होती. या शाळेची सहल दोन दिवसापुर्वी महाराष्ट्रातील धार्मिक, पर्यटन व गड किल्ले बघण्यासाठी गेली होती. या दरम्यान रविवार दि. ४ रोजी दुपारच्या वेळी हि सहल सोलापूर शहरातील एका जलतरण तलावातील पाण्याचा आनंद घेण्यासाठी शाळेतील सर्व मुला मुलींना शाळा प्रशासनाने येथे नेले. यापुर्वी प्राजंली हिने काही पदार्थ खाल्ले होते, तर काही जणाच्या चर्चेवरुन ह्या मुलीच्या नाका तोंडात तलावातील पाणी गेले. त्यामुळे येथेच तिच्या पोटातील उलटी घशात आडकली त्यामुळे तिचा मृत्यू झाला. सोलापूर येथील पोलीसांनी घटनेचा पंचनामा करुने प्राजंली मस्केचा मृतदेह रुग्णालयात नेण्यात आला. आज सोमवार रोजी सकाळी शवविच्छेदन होऊन तिचा मृतदेह सोलापूर येथे गेलेले तिचे नातलग घेऊन आणण्यासाठी रुग्णवाहिकेतून गेवराईकडे निघाले होते. दरम्यान शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतरच प्रांजलीचा नेमका मृत्यू नाका तोंडात पाणी गेल्यामुळे उलटी होऊन अथवा पदार्थ खाऊन उलटी घशात अडकली किंवा अन्य कारणाने झाला हे स्पष्ट होईल.

शिवसेना महिला नवनिर्वाचित पदाधिकारी निवड व हळदी कुंकाचा कार्यक्रम संपन्न

बीड - जिल्ह्यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या महिला आघाडीमध्ये महिला आयोगाच्या सदस्या ॲड. संगिताताई चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली इंन्ममिग सुरू आहे. यामुळे शिवसेना महिला आघाडी जिल्ह्यामध्ये पकड चांगल्या प्रकारची होतांना दिसून येत आहे. बीड शहरातील हॉटेल अन्वीताच्या हॉलमध्ये नवनिर्वाचित पदाधिकार्यांच्या निवडीसह हळदी कुंकाचा कार्यक्रम मोठ्या महिला पदाधिकार्यांच्या उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे सौ.सायलीताई सुनिल प्रभु, शिवसेना संपर्क प्रमुख किशोरजी पोद्दार, कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवसेना महिला संपर्क संघटक संपादाताई गडकरी, शिवसेना महिला जिल्हा संघटक ॲड. संगिताताई चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपन्न. या कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, शिवसेना जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे, शिवसेना शहरप्रमुख निजाम भाई शेख, तालुकाप्रमुख फरजाना शेख तसेच बीड जिल्ह्यातील सर्व उपजिल्हा, तालुका, शहर, विभाग प्रमुखातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आ.संदिप क्षीरसागरांची शासन, प्रशासनाकडे मागणी

पाणी पुरवठ्यासाठी टँकर सुरू करा

बीड (प्रतिनिधी)

संपूर्ण जिल्ह्यात सध्या पाण्याचे प्रमाण कमी झाले असून टंचाई जाणवत आहे. बीड शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या व वापराच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यासाठी टँकर सुरू करा. अशी मागणी आ.संदिप क्षीरसागर यांनी शासन व जिल्हाप्रशासनाकडे केली आहे.

दि.१० नोव्हेंबर २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकात बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला असून त्याबाबत उपाययोजना नमूद केल्या आहेत. त्यानुसार, सद्यस्थितीला संपूर्ण जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण झाली असल्याने बीड विधानसभा मतदारसंघातील बीड व शिरूर-कासार तालुक्यासह जिल्हाभरात टँकरने पाणीपुरवठा करून पाण्यावाचून होणारी नागरिकांची अडचण सोडवण्यासाठी तात्काळ टँकर सुरू करावेत अशी मागणी आ.क्षीरसागरांनी केली आहे. याबाबत आ.संदिप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, पाणीपुरवठा मंत्री, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

वलांडी घटनेच्या निषेधार्थ हिंदु जन आक्रोश मोर्चाने लातूर दणाणले

लातूर ।प्रतिनिधी

मौजे वलांडी येथील अत्यंत गरीब, मागासवर्गीय कुटुंबातील ६ वर्ष वयाच्या लहान मुलींवर निर्दयी आरोपीने अत्याचार केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ लातूर शहरांमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला यामध्ये संवेदनशील जनतेने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत या घटनेचा निषेध केला. मोर्चातील शिष्टमंडळाने प्रशासनाला आपल्या मागण्यांचे निवेदन देऊन आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या.

यावेळी आंदोलनात सहभागी झालेल्या अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साक्षीने सांगतोत की, राझ्याच्या पाटलाला छत्रपतींनी हात पाय तोडून कडेलोट केला होता तशी त्या नराधम कुरेशीस शिक्षा करता आली असती. पण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली लोकशाही आणि कायद्याला अभिप्रेत असलेल्या कायद्यास अनुसरून त्याबाबतचा गुन्हा क्रमांक २८/२०२४ दि.२५.०१.२०२४ रोजी कलम ३७६ अ, ब २ एन,३७७,५०६ अट्रोसिटी ३(१), डब्लू,३(२), तसेच बालकांचे लैगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम ४,६ अंतर्गत गुन्हे दाखल करून आरोपीला अटक करण्यात आलेली आहे.पिडीत कुटुंबात वयोवृध्द आजाराने ग्रस्त सासु, सासरे, एक विधवा महीला व त्यांच्या ४ लहान मुली, एक लहान मुलगा असा परिवार असून सर्व कुटुंबियांचा उदरनिर्वाह पीडितेच्या विधवा आईवरच आहे, जी मोलमजुरी करून उदनिर्वाह भागविते.

या आंदोलनात सहभागी झालेल्या आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, तुम्ही पिडीत व आरोपीचे घर एकमेकांच्या समोर आहे त्यामुळे पिडीत कुटुंबाची सोय इतरत्र करावी अथवा पिडीत कुटुंबीयास पोलीस संरक्षण देण्यात यावे.,पिडीत कुटुंबीयास शासनाच्या वतीने समाजकल्याण विभाग, मनोधैर्य योजनेतंर्गत आर्थिक मदत करण्यात यावी.,पिडीत बालिकेच्या पुनर्वसनाचा (शैक्षणिक आदी) संपूर्ण खर्च शासनाने उचलावा, सदरचे प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा,विशेष सरकारी वकील म्हणून अँड उज्ज्वल निकम यांची नेमणूक करण्यात यावी,पिडीत कुटुंबियात अल्पवयीन ४ मुली, १ मुलगा असल्याने सर्व बालकांना बाल संगोपन योजने अंतर्गत (विशेष बाब म्हणून) मदत करण्यात यावी, समाजकल्याण विभाग अंतर्गत पिडीत कुटुंबीयास उदरनिर्वाहासाठी शेत जमीन देण्यात यावी माता रमाई घरकुल योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यात यावा,संपूर्ण प्रकरणाचा निकाल लागे पर्यंत आरोपीला गाव बंदी करण्यात यावी जेणेकरून गावात धार्मिक/जातीय तेढ अथवा तणाव निर्माण होणार नाही याची काळजी प्रशासनाच्या वतीने घेण्यात यावी.

पिडीत कुटुंबीयास न्याय मिळवून देण्यासाठी अशा आशयाचे निवेदन मा ना श्री एकनाथ जी शिंदे साहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य , मा ना श्री अजित दादा पवार साहेब,उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,मा ना श्री देवेंद्र जी फडणवीस साहेब,उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य,मा ना श्री संजय जी बनसोडे साहेब,

मंत्री, क्रीडा व युवक कल्याण बंदरे,महाराष्ट्र राज्य ,मा ना अदितीताई तटकरे,महिला व बालकल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्यमा श्रीमती वर्षा जी ठाकुर घुगे,जिल्हाधिकारी, लातूर मार्फत सबंधिताना उचित आदेश देण्याची विंनती करण्यात आली आहे. तर निवेदनाची प्रत माहितीस्तव मा पोलिस अधिक्षक, लातूर, मा जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, लातूर,मा सहाय्यक आयुक्त समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना देण्यात आली आहेत.जुने जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे महिलांनी प्रातिनिधिक स्वरूपात निवेदन वाचन करून निवेदन देण्यात आले.

संपादकीय

परिवर्तनाच्या वाटेवरील क्रांतिदूत

ग्रंथालये हा आपल्या समाजाचा श्वास आहे, ही जाणीव टप्प्याटप्प्यावर मला होत राहिली आहे. लहानपणी माझ्या विक्रोळीच्या उदयाचल शाळेत सुसज्ज ग्रंथालय होते. आमची शाळा आठ तासांची होती, त्यामुळे मधल्या सुट्टीत किंवा वाचनाच्या तासालाच तिथे जाण्याकरिता वेळ मिळायचा. पुढे सोमैया महाविद्यालयातले दोन मजली ग्रंथालय, तिथली आवडती जागा नि पुस्तकांची भरलेली कपाटे यांना माझ्या आयुष्यात फार मोठे स्थान आहे. १९६० सालापासूनच्या या ग्रंथालयात अगणित पुस्तके आहेत. मुक्तपणे कपाटे पाहता येतात, हे या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य, त्यामुळे हव्या त्या विषयावरची पुस्तके मनसोक्तपणे शोधता येतात. पुढे एम.ए.साठी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला.

राजाबाई टॉवरमधील विद्यापीठाच्या ग्रंथालयाची वास्तू अविस्मरणीय आहे. तिथल्या ग्रंथालयात दिवसभर अभ्यास करण्यात अवर्णनीय आनंद असायचा. याच काळात दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची ओळख झाली. वृत्तपत्रीय कात्रणे, मासिके यांचे दुर्मीळ संदर्भ सापडले की, अमाप आनंद व्हायचा. माझ्या डॉक्टरेटच्या अभ्यासात ग्रंथालयांचे योगदान मोठे आहे. या सर्व ग्रंथालयांची आठवण आली, ती ठाणे जिल्ह्यातील ग्रंथालयांच्या अधिवेशनानिमित्ताने. ठाण्यातील स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालय या अधिवेशनाच्या आयोजकांच्या प्रमुख भूमिकेत होते. अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात रंगकर्मी सुहास जोशी यांचे भाषण ऐकले. रंगभूमीविषयक पुस्तकांमुळे होणारे संस्कार किती मोलाची भूमिका बजावतात, हे या भाषणातून त्यांनी सहज उलगडले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रदीप कर्णिक होते. रूपारेलसारख्या प्रथितयश महाविद्यालयाचे ग्रंथपाल, मराठी संशोधनपत्रिकेच्या संशोधनाचा अनुभव नि व्यक्तिमत्त्वाला व्यासंगी अभ्यासकाचे परिमाण यामुळे कर्णिकांचे भाषण ऐकण्याची उत्सुकता होती.

ग्रंथालय सेवकांची उपेक्षा नि त्यांना मिळणारे तुटपुंजे वेतन याकडे कर्णिक यांनी लक्ष वेधले. शासनाच्या प्रस्तावित 'मराठी विद्यापीठा'त ग्रंथालये व ग्रंथालयशास्त्र, तसेच त्याविषयीचे अभ्यासक्रम यांना महत्त्वाचे स्थान असले पाहिजे हा मुद्दा मांडला. अनेक ग्रंथालयांची आजमितीला दुरवस्था झालेली आहे. धुळीने कपाटे भरली असतील, तर ग्रंथालय सेवकांना त्रास होऊ शकतो म्हणून त्यांनी आपली योग्य काळजी घ्यावी, असे मत साहित्यिक-समीक्षक डॉ. अनंत देशमुख यांनी आवर्जून व्यक्त केले. ग्रंथालये क्रांतीचे दूत बनून समाजात काम करतात. मात्र आपल्या समाजात त्यांचे मोल समजून घेतले जात नाही. वाचक आहेत तिथे ग्रंथालये अपुरी पडतात, तर ग्रंथालये आहेत तिथे वाचक नाही, अशी परिस्थिती आज आहे. कल्पक ग्रंथपाल वाचकांना वाचनाकडे आकृष्ट करतात.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनप्रेम रुजवणाऱ्या अतिशय मेहनती ग्रंथपालाशी नुकतीच माझी भेट झाली. परितोष पवार मुलुंडच्या केळकर महाविद्यालयात कार्यरत आहेत. वाचनकट्टा, बातमीपत्र, ग्रंथालयाची वेबसाइट, विशिष्ट विषयावरील पुस्तकप्रदर्शन, ई - वाचनस्रोतांचा उचित उपयोग एक ना दोन असंख्य उपक्रम परितोष राबवत आहेत. एखाद्या विद्यार्थ्याने एखादा विषय त्यांच्यासमोर मांडणे व त्या प्रकल्पाकरिता अनेक संदर्भांचा शोध ग्रंथपालांनी घेणे, हे पवार सर सातत्याने करत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आज वाचनासाठी अनेक दिशा उपलब्ध आहेत. परितोष पवारांसारखा ग्रंथपाल याकरिता प्रयत्न करतो.

माता व बाल रुग्णालयासाठी निधी द्यावा लिफ्ट,आक्सिजन पाइपलाइन, फर्निचर

९ महिन्यांपासून २०० खाटांची इमारत धुळखात पडुन:- डॉ.गणेश ढवळे

बीड।प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयातील महिला व बालरुग्णांसाठीची राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत २१ कोटी रूपये खर्चून बांधण्यात आलेली २०० खाटांच्या ५ मजली ईमारतचे बांधकाम पूर्ण झाले असुन लिफ्ट,आक्सिजन पाइपलाइन, फर्निचर आदि उर्वरित कामांसाठी ७ कोटी ४५ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असुन शासनाच्या उदासीनतेमुळे निधी अभावी ९ महिन्यांपासून बांधकाम पुर्ण झालेली इमारत धुळखात पडुन असुन अपु-या जागेमुळे गर्भवतींची महिलांची हेळसांड होत असुन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी व जिल्हा प्रशासनाच्या उदासिनतेच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, जिल्हा शल्यचिकित्सक बीड

यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्यमंत्री, पालकमंत्री बीड यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख,अरूण खेमाडे, प्रदीप औसरमल, रेहमान सय्यद, बाळासाहेब शिंदे आदि.सहभागी होते.

बीड जिल्हा रूग्णालयाची इमारत जुनी आणि अपुरी आहे.याच ईमारतीत सोनोग्राफी केंद्र आणि एक्स रे मशिन तपासणी विभाग आहे.सोनोग्राफीसह एक्स रे करण्यासाठी येणाऱ्या रूग्णांची नियमित संख्या ४०० च्या घरात आहे.यापैकी गर्भवती महिलांची संख्या २०० च्या आसपास आहे.व्हरांड्यामध्ये बसण्याची व्यवस्था केवळ १५-२० रूग्णांपुरतीच आहे.त्यामुळे गर्भवती रूग्णांना ताटकळत उभे रहावे लागते.अपुरी जागा व अपुरे खाट यामुळे गर्भवती महिलांची हेळसांड होत आहे.ओपीडी, सोनोग्राफी तसेच आयपीडी मध्ये रूग्णांची संख्या अधिक व उपलब्ध साधन सामग्रीची क्षमता कमी असल्याने माता व बाल रूग्णालयाची स्वतंत्र इमारत बांधकामाची सुरूवात ४ वर्षांपूर्वी झाली होती.ती पुर्ण होऊन ९ महिने झाले मात्र लिफ्ट आक्सिजन पाइपलाइन, फर्निचर आदि उर्वरित कामामुळे वापरात येत नसुन धुळखात पडुन आहे.त्यामुळे गर्भवती महिलांची हेळसांड थांबवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

धार्मिक स्थळांसाठी कोट्यवधींचा निधी देणा-या लोक लोकप्रतिनिधींचे आरोग्य विभागाकडे दुर्लक्ष :- डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यातील विकास धार्मिक स्थळांच्या ठिकाणी निधी देण्यासाठी चढाओढ लागताना दिसुन येत असताना हेच लोकप्रतिनिधी आरोग्य विभागाशी संबंधित माता व बाल रूग्णांसाठी आवश्यक इमारतीच्या उर्वरित कामांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मात्र दुर्दैवाने दुर्लक्ष करताना दिसत असुन याबद्दल जनसामान्यांच्या मनात तिव्र नाराजी आहे.

भाजपा ने लोकांना भावनीक करुन कीतीही ईव्हेंट केले

तरी लोक बेरोजगारी,महागाई,महिलांवरील अत्याचार, शेतीमालाला नसलेले भाव विसरनार नाहीत-प्रदिप थोरवे

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी-आम आदमी पक्षाची राज्यभरात जोरदार संघटनबांधणी सुरू आहे याच अनुषंगाने बीड येथे महाराष्ट्र प्रदेश प्रमुख रंगा (दादा), युवक प्रदेश संघटन मंत्री प्रदिप थोरवे, बीड जिल्हाअध्यक्ष अशोकराव येडे यांच्या ऊपस्थीतीत मेळावा पार पडला. यावेळी प्रदिप थोरवे कार्यकरत्यांना संबोधीत करत होते. येणाऱ्या निवडणुकांमध्ये आम आदमी पार्टीचे उद्दिष्ट लोकशाही वाचवणे व भाजपची हुकुमशाही संपवने हेच असेल. भाजपा ला सध्या त्यांनी काय विकास केला हे सांगायला नसल्यामुळे ते लोकांना भावनीक करुन राम मंदीर सारखे ईव्हेंट करत आहेत. जेनेकरुन लोक बेराजगारी,महागाई,महीलांवरील मनीपुरसाख्या ठीकानी झालेले अत्याचार,शेतीमालाला नसलेले भाव, हे सगळे मुद्दे विसरुन लोक पुन्हा भाजपा ला मतदान करतील हा त्यांचा भ्रम आहे. जर येनार्या काळामधे ईडीया आघाडी एकसंघ राहीली तर मोदिंना हरवने जास्त अवघडही नाही.दिल्लीचे मुख्यमंत्री आणी पक्षाचे अध्यक्ष अरविंदजी केजरीवालांचे स्वप्न मेक ईंडीया नं वन करन्यासाठी सर्व कार्यकरत्यांनी आपल्या गावातील ग्रामपंचायतीमधुन होनार्या विकासकमांवर अंकुश ठेवावा. बोगस बिले ऊचलन्यास विरोध करावा. कारण गावचा

विकास हा महत्वाचा आहे. गाव नं वन झाले तरच हा देश नं वन होईल.

गावागावांत सुरु असलेली जलजीवन मीशन योजना असेल, कींवा १५ वा वित्त आयोग अंतरर्गत आपल्या ग्रामपंचायतला कीती नीधी आला व कसा खर्च करण्यात आला, कुठे खर्च केला पाहीजे, गावातील/ वस्तीवरील रस्ते याबाबत आपन वेळोवेळी सरपंच, ग्रामसेवक यांना विचारना केली पाहीजे.गावांनमधील शासकीय दवाखाने,शाळा,पाणी, वीज यांसारख्या प्रश्न सोडवन्यासाठी आपले कार्यकर्ते सगळ्यात पुढे असले पाहीजे, तरच आपला पक्ष घराघरांत पोहचेल. आपला पक्ष देशात तिन नंबर ला आहे, जेव्हा दोन नंबर ला येईल तेव्हा मोदिंना पर्याय अरवींद केजरीवाल असतील म्हनुन केजरीवालांना चुक नसताना जेल मधे पाठवन्याची ईडी मार्फत भाजप घाई करत आहे

येणार्या काळामधे आपला पक्ष महाराष्ट्रामधे लोकसभा, विधानसभा,नगरपालीका, जिल्हापरीषद, पंचायत समीती अशा सगळ्या निवडनुका लढवेल त्या दुष्टीने सर्व पधीकारी आणी कार्यकर्ते यांनी आपआपल्या प्रभागात तयारी करणे गरजेच आहे. यावेळी बीड जिल्हा आम आदमी पार्टी च्या वतीने, जि.अध्यक्ष अशोक येडे,सचीव रामधान जमाले,

ऊपजिल्हाअध्यक्ष रमेश गुट्टे, मराठवाडा संघटक सुग्रीव मुंडे,बीड संघटक आण्णा राऊत, डॉ.महेश नाथ,शि.का.ता अ.जरांगे पाटील,स्वप्निल पोटे,पठान शकील,दिपक झाडे, शैलेश थोरवे, भिमराव कुटे व ईतर पदाधीकार्यांसमवेत प्रदिप थोरवे यांचा प्रदेश युवक संघटन मंत्री पदि निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

आरोग्यसेवा करशी करावी, याचे उत्तम उदाहरण बाजीराव चव्हाण

उद्योगमंत्री उदयजी सामंत यांच्याकडून प्रशंसा बीड येथील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षास भेट

बीड : महाराष्ट्राचे संवेदनशिल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवा कशी करावी, याचे उत्तम उदाहरण म्हणजे आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण होय, अशा शब्दांत राज्याचे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांनी प्रशंसा केली. बीड येथील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षास २ फेब्रुवारी रोजी मंत्री महोदय यांनी सदिच्छा भेट दिली. युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात सर्व टीमशी संवाद साधला. पुढे बोलताना मंत्री उदयजी सामंत म्हणाले, राज्याचे संवेदनशिल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली बाजीराव चव्हाण हे सामाजिक काम करत असताना वैद्यकीय सेवा कशी करावी, वैद्यकीय धोरण कसे राबवावे, याचे नितांत उत्तम उदाहरण म्हणजे आरोग्यसेवक बाजीराव चव्हाण हे होय. बाजीराव चव्हाण यांचे संपूर्ण राज्यभर काम आहे. त्यांच्या कामाला तोड नाही, अशा शब्दांत मंत्री महोदय यांनी चव्हाण यांच्यासह त्यांच्या टीमची प्रशंसा केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी धर्मवीर प्रतिष्ठाणचे मसुराम कदम, अरविंद जाधव, काशीनाथ जाधव, अरुण घुमरे,कृष्णा यादव, दिनकर शिंदे, आण्णा शिंदे, राजेंद्र तांगडे, अक्षय घाडगे, आदिनाथ सुर्वे, आनंद शिंदे, विलास

मस्के, महेश साळुंके, संदीप माने, पंकज कदम, विश्वनाथ जाधव यांनी परिश्रम घेतले.

मंत्री उदयजी सामंत यांचे धर्मवीर प्रतिष्ठानकडून जंगी स्वागत

धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकारातून बीड शहरात राज्याचे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांचे जंगी स्वागत करण्यात आले. जेसीबीतून फुलांची उधळण करण्यात आली. यावेळी माजी मंत्री सुरेश नवले, लोकसभा संपर्कप्रमुख विजय पाटील, बीड जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर, युवा सेना जिल्हा प्रमुख अजय सूरवसे, सुमित कोळपे, डॉ.ज्ञानेश्वर जाधव आदींची उपस्थिती होती.

आता बाजीराव चव्हाण यांनी नवी जबाबदारी घ्यावी : मंत्री सामंत यांची सूचना

मंत्री उदयजी सामंत यांनी बाजीराव चव्हाण यांचे आरोग्य सेवेतील काम पाहता आता त्यांनी नवी जबाबदारी घ्यावी,अशी सूचना मंत्री महोदय यांनी केली. राज्यभर युवा सेनेच्या प्रत्येक कार्यकर्त्यांना आरोग्य सेवेच्या ज्या योजना आहेत, त्याचे प्रशिक्षण देण्यात यावे, जेणे करून सरकारच्या आरोग्यसेवेचा समाजातील शेवटच्या घटकांना न्याय मिळेल.

पान ४ वरून...

यशवंत हा.ज्यु.कॉ.चे...

परिस्थितीत सर्वात महत्त्वाचा आपल्या अंगी हवा असणारा गुण म्हणजे संयम आणि हाच गुण बोईनवाड सरमध्ये पहावयास मिळतो. स्वामी विवेकानंद म्हणतात, मी त्या ईश्वराचा भक्त आहे, ज्याला लोक सामान्य माणूस म्हणतात. सामान्यमाणसांची निःस्सीम मनोभावे सेवा करणारी, त्यांना प्रेम देणारी माणसे विरळच असतात. पण त्याला बोईनवाड सर हे अपवाद आहेत.नेहमी शैक्षणिक क्षेत्रात जनसामान्यांमध्ये रमणारा माणूस म्हणून त्यांची ख्याती आहे. ते सामान्य माणूस आणि शिक्षक केंद्रबिंदू मानून आपली वाटचाल करत होते. यावेळी बोलताना बोईनवाड सर म्हणाले की मी शैक्षणिक पार्श्वभूमीवर माझी उमरी येथे बदली झाल्यामुळे मी यशवंत हा.ज्यु.कॉ.उमरीकरांचे प्रेम कदापी विसरणार नाही येथील संस्था चालक,शिक्षक वृंद विद्यार्थी माझ्या कार्यकाळात हायस्कूल येथे सलोखा कायम ठेवत मला चागल सहकार्य केले माझ्या बरोबर माझ्या सहकाऱ्यांवर दाखवलेल्या विश्वासाचा मी सदैव ऋणी राहील अशा भावनिक शब्दात त्यांनी निरोप समारंभ प्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. यावेळी,सभापती शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर,नां.जि.म.बॅक संचालक श्री.कैलासभाऊ देशमुख गोरठेकर साहेब,शंकर मनाळकर,गंगाधर कल्याणकर,लक्ष्मण घोरपडे,गणेश आनेमवाड बितनाळकर,दिलीप रेनेवाड, संजय चुनुपवाड,दिगांबर जगताप साहेब,साईनाथ जमदाडे,कुदळेकर,चिंचाळकर, श्रळल एजंट तळेगावकर,प्रशांत गडमवाड बरबडेकर, मामिलवाड सर,पत्रकार उद्धव मामडे पिराजी कराडे,फराद बेग,रावसाहेब जाधव,बोडलवाड साहेब,डॉ.नेकेवाड,डुमलवाड,राम मामिलवाड,विश्वंभर मदेवाड,चेअरमन सहदेव कळकटवार निमटेककर, बालाजी गुळेवाड,दिगांबर मंतलवाड,सरपंच बालाजी नासलवाड परमेश्वर मुदिराज, नागरिक बहुसंख्य उपस्थित होते.बोईनवाड सर अत्यंत सन्मानाने आपण आपली सेवा बजावली आहे.आपले कार्य आम्हांसारख्यांना एक प्रेरणास्त्रोत सेवापूर्तीनिमित्त आपणास हार्दिक लक्ष-लक्ष शुभेच्छा. उत्तम आरोग्य तथा प्रदीर्घ,उदंड आयुष्य लाभो हीच सदिच्छा उपस्थित सर्व जण शुभेच्छा दिल्या आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब..

पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे हे करत आहे भाजप व जातीयवादी पक्षांना श्री उद्धव ठाकरे हे देत असलेली कडवी झुंज बघून अल्पसंख्यांक मुस्लिम समाज व दलित समाज यांचा कल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे वाढलेला असून अल्पसंख्याक समाजाने व दलित समाजाने श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्व मान्य करत असून दलित व मुस्लिम समाज खंबीरपणे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पाठीशी येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये उभा राहणार असून शिवसेनेचा भगवा विधानमंडळ व जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद या ठिकाणी निर्विवादपणे फडकणार आहे असे म्हंटले

यावेळी बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोर पोतदार, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हा संघटक नितीन धांडे उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महू वाले उपजिल्हाप्रमुख सोळंके तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंगन, रवी अण्णा वाघमारे,गजानन कदम,तालुका संघटिका संगीताताई चव्हाण,पक्षप्रवेश घेतलेले नय्युम भाई जोगदंड व कय्युम इनामदार आदी शिवसैनिक व मान्यवर उपस्थित होते

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून नागोबा गल्ली येथून युवकांची भव्य अशी मोटरसायकल रॅली रवी वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या मोटरसायकल रॅलीमध्ये तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बौद्ध, मुस्लिम कार्यकर्त्यांचा अनोखा संगम या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रवेश सोहळ्यात दिसून आला हरा नीला भगवा एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळालं यामुळे बीडच्या भविष्याच्या राजकारणात दूरगामी परिणाम होणार असं दिसत आहे.

महाविकास आघाडी...

खेचून आणूयात असे म्हटले. या कार्यक्रमात अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी माजी महापौर आनंदराव पाटील चव्हाण, युवा नेते रविंद्र पाटील चव्हाण,नायगाव नगरपंचायत उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण, श्रीनिवास पाटील चव्हाण, सुभाषजी देशमुख गोरठेकर, सभापती शिरीष भाऊ देशमुख गोरठेकर, मा. शिक्षण सभापती संजयजी बेळगे, मा.जि.प.सदस्य आनंदराव येलमगोंडे, ज्येष्ठ नेते गोविंदराव पाटील सिंधीकर, पांडुरंग देशमुख गोरठेकर, उमरी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रल्हाद पाटील इज्जतगावकर, नायगाव विधानसभा अध्यक्ष बापूसाहेब पाटील कोडगावकर, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) तालुकाध्यक्ष बालाजी पाटील सावंत गोरठेकर,वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष संदेश कांबळे सिंधीकर, खाजा सेठ उमरीकर,उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील नागठाणेकर, दिगंबर गायकवाड नागठाणेकर, प्रकाश पाटील चिंचाळकर, हनमंत पाटील सुजलेगावकर, आबाजी पाटील पवळे पळसगावकर, रावसाहेब पाटील कुदळेकर, मार्केट कमिटी संचालक ज्ञानेश्वर पाटील कुदळेकर, माधवराव पाटील शिंगणापूरकर, देवराव पाटील हासेकर,आतम चव्हाण, श्रीपाद पाटील कावलगुडेकर, उत्तम चव्हाण, रावसाहेब पाटील शिरूरकर, मोहनराव पाटील कार्लेकर,मनोज पाटील जामगावकर, गंगाधर पाटील बेंद्रे, दिगंबर सावंत गोरठेकर, बालाजी पाटील बोळशेकर, रामेश्वर पाटील कुदळेकर, बाबू पैलवान, बालासाहेब पाटील हातनीकर, बंडूराव सर्जे धानोरकर, व्यंकटराव केसगिरे, मारोतराव पाटील हिवराळे, उत्तम पाटील बिजेगावकर, रावसाहेब पाटील बोरजूणीकर, अनिल पाटील निमटेकर, दिनकर भंडारे, व्यंकटराव पाटील कदम शेलगावकर, रावसाहेब पाटील बोळसेकर, चेअरमन विजय पाटील कदम भायेगावकर, राजेश पाटील ढगे वाडीकर, काँग्रेस सोशल मीडिया तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर दारसेवाड, दत्ताहरी पाटील लोहारे, हनमंत पाटील जगदंबे, बालाजी पाटील ढगे (छोटा छावा), राजू पैलवान बितनाळकर, दासा पाटील शिंदे व महाविकास आघाडीतील संपूर्ण कार्यकर्ते व सर्व वर्तमानपत्राचे पत्रकार बांधव यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार युवा नेते रविंद्र पाटील चव्हाण यांनी केले.

पेठ बीड मध्ये...

हिंदू समजा सोबतच मुस्लिम, बौद्ध समाजा मध्ये त्यांच्या विषयी प्रचंड सहानुभूती असून या सहानुभूतीत राज्यातील मिंधे सरकार व दिल्लीचे हुकूमशहा मोदी शहा चे सरकार वावहत जाणार आहे

यावेळी बोलताना जिल्हा प्रमुख गणेश वरेकर म्हणाले की राज्यातील गद्दाराचे सरकार उलथवून टाकण्यासाठी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे हे प्रचंड मेहनत घेत असून त्यांना मुस्लिम बौद्ध समाजाचा पण खूप मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे येणाऱ्या निवडणुकीत हिंदू मुस्लिम बौद्ध एकजुटीने मिंधे सरकार हद्दपार करणार आहे शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांचे स्वागत असून तुमच्या आणि समाजाच्या प्रत्येक अडी अडचणी वेळी मी पाठीशी खंबीर उभे राहील व न्याय मिळवून देईल शिवसेना शहर प्रमुख शेख निजाम म्हणाले कीशेख नयुम व अमित जोगदंड यांच्या पक्ष प्रवेशा मुळे पेठ बीड भागात शिवसेनेची ताकद वाढली असून येणाऱ्या निवडणुकीत त्यांचा फायदा पक्षाला होईल सध्या नगर परिषदेत प्रशासक राज असून पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी नगर परिषद बकाल आणि कंगाल केली आहे शहरात अस्वच्छता अस्वच्छता वाढली असून कर्मचाऱ्यांची मनमानी पद्धतीने कारभार सुरू आहे स्वच्छ आणि सुंदर व भ्रष्टाचार मुक्त नगर परिषद करण्यासाठी आपण शिवसेनेच्या पाठीशी खंबीर उभे राहून येणाऱ्या निवडणुकीत नगराध्यक्ष निवडून आणावासदरील शाखेचा व पक्ष प्रवेशा च्या कार्यक्रमाचे आयोजन युवा नेते रवी वाघमारे यांनी केले होते यांच्या नियोजपूर्वक कार्यक्रमा मुळे मुस्लिम व बौद्ध समाजाचे असंख्य तरुण शिवसेनेत दाखल होत आहे शिवसेनेचा नगराध्यक्ष निवडून आणण्यासाठी आपण जीवाचे रान करू अशी ग्वाही त्यांनी दिली

रिपब्लिकन सेना शहर अध्यक्ष यांनी शिवसेना पक्ष प्रवेशा वेळी मनोगत व्यक्त केले की संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेच एकमेव नेते मैदानात उतरले असून तेच मोदी शहा यांच्या सरकारला धूळ चारतील धर्मा धर्मातील वाद लावण्याचे भाजपचे नेते षडयंत्र रचत आहे ते उधळून लावण्याचे सामर्थ्य फक्त उध्दव ठाकरे यांच्या त आहे म्हणून आम्ही असंख्य तरुण शिवसेनेत प्रवेश करत आहोत.

माजलगाव तहसील...

लावून भ्रष्ट कर्मचारी व अधिकारी यांना संरक्षण देण्यासाठी कार्यालयाच्या आवारात सीसीटीव्ही फुटेज लावलेत काय असा सवाल शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ड नारायण गोले पाटील यांनी केला असून तहसील कार्यालयाच्या आवारात लावलेले सीसीटीव्ही फुटेज तात्काळ बंद करून कार्यालयात लावण्यात यावेत तसेच भ्रष्ट मंडळाधिकारी सानप व संबंधित भ्रष्ट कर्मचारी यांच्या मार्फत चालू असलेला भ्रष्टाचार थांबवून तात्काळ संबंधितावर कठोर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड.नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ, भाई अभिजीत आठवे, जयराम कोरडे, मोजम कुरेशी, आखिल कुरेशी, त्रिंबक धिरडे, जनार्दन कुदळे, सोनाजी जाधव, श्रीराम शेवाळे आदींनी दिला आहे.

माजलगाव मध्ये शनिवारी ...

माजलगावमध्ये आयोजन करण्यात आले आहे. केशवराज मंगल कार्यालय येथे हा संवादरुपी प्रश्नोत्तराचा कार्यक्रम होत असून यात डॉ.मुकुंद बजाज, डॉ.अमित दुल्लरवार, डॉ.यशवंत राजेभोसले व डॉ.शिवरत्न शेटे हे सहभागी होणार आहेत. पत्रकार संजय मालाणी हे या सर्व तज्ज्ञांची मुलाखत घेतील. यात उपस्थित श्रोत्यांमधूनही हृदय रोगासंबंधी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांवर तज्ज्ञ डॉक्टर मार्गदर्शन करतील. या बैठकीस डॉ.शामसुंदर काकाणी, डॉ.यशवंत राजेभोसले, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर व ऑड भानुदास डक यांनी मार्गदर्शन केले.

मोहनराव जगताप यांच्या....

मोहनराव जगताप यांनी सर्व गावकऱ्यांना काम चांगल्या प्रतीचे करून घेण्याचे आवाहन केले. तसेच गावच्या विकासासाठी यानंतर शासन स्तरावर प्रयत्न करून वेगवेगळ्या योजनेतून कामे आणायचे आश्वासन दिले. सदर काम ५१ लक्ष रुपये मधून हनुमान मंदिरासमोर २० लक्ष सिमेंट काँक्रीटची गच्ची, १० लक्ष रुपये पेव्हर ब्लॉकचे रस्ते, २५/१५ मधून ११ लक्ष रुपये सिमेंट रस्ता व नाली बांधकाम विविध विकास कामाचे उद्घाटन करण्यात आले.

कुंडलिक खांडे हे विकासाभिमुख नेतृत्व- महंत योगीराज महाराज

देव आणि धर्माच्या कार्यासाठी कुंडलिक खांडे यांना रामगडाचे कायम आशिर्वाद- योगीराज महाराज

बीड (प्रतिनिधी)
तळागाळातील लोकांना आपलेसे वाटणारे,देव आणि धर्माच्या कार्यात स्वत:ला वाहून घेणारे कुंडलिक खांडे यांच्यासारखे नेतृत्व विरळच आहे. श्री.खांडे हे विकासाभिमुख नेतृत्व आहे अशा धर्माभिमानी नेतृत्वाला रामगडाचा कायम आशिर्वाद असल्याचे प्रतिपादन रामगडाचे मठाधिपती योगीराज महाराज यांनी केले. तर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेबांमुळे राज्यातील
देवस्थानांच्या विकासामध्ये प्रगती होत आहे, विकास कामांना गती येत आहे. आपली परंपरा, आपले श्रध्देय स्थाने आपणच विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे जिल्हाप्रमुख खांडे म्हणाले.

शिवजन्मोत्सव समिती आयोजित सामूहिक विवाह सोहळ्यासाठी गरजवंतानी नोंदणी करावी - बाळु ताकट

माजलगाव (प्रतिनिधी)
शहरात प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शिवजयंती निमित्त सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता दोन आठवडे अवधी बाकी असून गरजवंत वधु - वरांच्या पालकांनी तात्काळ नोंदणी करावी,असे आवाहन शिव जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बाळु ताकट यांनी केले आहे.
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती व दुग्धशर्करा योग म्हणून शिवराज्यभिषेकाचे ३५० वर्ष आहे. त्यामुळे या वर्षीचा शिव जन्मोत्सव विविध सांस्कृतिक परंपरा जपणारे देखाव्याचे आकर्षण ठरणार आहे. त्यातच दरवर्षीप्रमाणे सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा शिवजन्मोत्सव दिनी दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी उत्साहात होणार आहेत. यास दोन आठवडे बाकी असून गरजवंत वधु - वर यांच्या पालकांनी विवाह सोहळ्या साठी लवकरात लवकर नाव नोंदणी करावी, असे आवाहन शिव जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बाळु ताकट, प्रशांत होके, राहुल मुगदिया, बल्लो(विष्णु)होके, प्रसाद सावंत, सचिन सुरवसे, सुमित कुलकर्णी, वैभव मिठकरी, स्वप्नील भानप,पप्पु काळे,सुरज पवार, अजय रांजवण, युवराज नरवडे, प्रसाद काळे,राहुल सरोदे,अमर राजमाने,प्रदीप जाधव,मयूर वाघमारे,राजेश कोंबडे यांनी केले आहे.

बीड शहर व तालुक्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचा झंझावात सुरूच

बीड (प्रतिनिधी)
बीड शहरातील गांधीनगर नाळवंडी रोड येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार यांच्या शुभहस्ते व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व युवासेनेचे अंकित भैय्या प्रभू ,जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत व शहरप्रमुख निजामभाई शेख व रविअणणा वाघमारे यांच्या पुढाकारातुन पाच शाखेचे उद्घाटन व परिसरातील शिवसैनिकांचा भव्य मेळावा जल्लोषात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी नयुमभाई व अनिकेत जोगदंड व त्यांच्या शेकडो समर्थकांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत प्रवेश केला.याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी येणाऱ्या काळात गद्दारांना धडा शिकविण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज राहुन पुन्हा एकदा उद्धवजी ठाकरे साहेबांना मुख्यमंत्री करण्यासाठी तयार रहावे असे आवाहन व विनंती केली.व भाजपचे सरकार चले जाव हा नारा दिला.कार्यकर्माला उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले , तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , शहरप्रमुख निजामभाई शेख , महिला आघाडीच्या बीड विधानसभाप्रमुख मीराताई नवले , युवा सेनेचे गजानन कदम,खयुम भाई शेख , रमेश नवले ,शेख सिराज भाई , अशपाकभाई , रऊफभाई , यांच्यासह परिसरातील हिंदू मुस्लिम व दलित बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुचाकी - ट्रक अपघातात; माय लेकाचा जागीच मृत्यू

माजलगाव (प्रतिनिधी)
माजलगाव ते गढी रोडवर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅकचा व दुचाकीचा अपघात झाला.यामधे दुचाकी वरील माय लेकराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवार दि ०४ फेब्रुवारी संध्याकाळी ८.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.
दि.४ फेब्रुवारी रविवार रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या दरम्यान माजलगाव - गढी रोडवर माऊली फाटा (हारकी लीमगाव) येथे ऊस वाहतूक करणारा ट्रक व दुचाकीचा अपघात झाला.यामधे दुचाकीवरील भागवत उर्फ पप्पु सुभाष इंगळे (वय २२ वर्षे) व मालन सुभाष इंगळे (वय ४७ वर्षे) रा.राजेगाव हे माय लेकराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.या घटनेमुळे राजेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आज मौजे भंडारवाडी येथील मेडची देवी यात्रे निमित्त जंगी कुस्त्यांच्यां कार्यक्रम भंडारवाडी येथे संपन्न झाला. याप्रसंगी बाजीराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली पै . अक्षय सालगुडे विजयी मल्ल याना मानाची चांदीची गदा बाजीराव चव्हाण याच्या हस्ते देण्यात आली.भंडारवाडी हे गाव कुस्त्यांसाठी प्रसिद्ध असल्यामुळे महाराष्ट्र नामांकित मल्लांची येथे दर्शनीय उपस्थिती होती.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाजीराव चव्हाण यांचे स्वागत धर्मवीर प्रतिष्ठान सदस्य व ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ जाधव,सरपंच लालासाहेब सालगुडे,यांनी केले याप्रसंगी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव नाना मातकर, डॉ.ज्ञानेश्वर जाधव, निखिल मस्के,पै.कृष्णा नागवे,काकडे साहेब,उद्धव मडके,यांचाही सत्कार गावातील नागरिकांनी केला याप्रसंगी भंडारवाडीतील सर्जेराव गमे, राहुल गमे, मच्छिंद्र सालगुडे, सचिन सालगुडे,उमेश जाधव,अजय सालगु,विलास जाधव,अमोल सालपे, सुजित सालगुडे,दादा गमे, बळीराम जाधव, हनुमान सालगुडे,बापु गोकुळे, बाबासाहेब सालपे, पांडुरंग सालगुडे,रामहारी सालगुडे,विशाल जुळे,बापु जुळे,अतुल सालगुडे, महादेव सालगुडे,आंगद जाधव,विकास जाधव,बाबु जाधव,स्वामी सालगुडे,व सर्व गावकऱ्यांनी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.आकाश जाधव, सचिन जाधव, प्रणव सालगुडे,संग्राम सालगुडे,तुकाराम सालगुडे,महादेव जाधव,गमे ज्ञानेश्वर, वाल्मीक सिगण, रणजीत जाधव, अजय जाधव, विलास जुळे, काशिनाथ, लगुडे, खंडेराव सालगुडे, मुकुंदा सालगुडे, सोनामथ सालगुडे,बाबा साहेब पै.अक्षय सालगुडे, दिपक गमे,

तलवाडा येथील तलाठी सज्जावर तलाठी रुजु शेख खिजर यांच्या प्रयत्नास यश

लाखो रुपय खर्चुन बांधलेल्या तलाठी कार्यालयाची अवस्था भुत बंगल्या समान!

शेख आतिख/तलवाडा
गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे काही वर्षापुर्वी महसुल प्रशासनाने शेतक-यांच्या व्याथा लक्षात घेऊन तलाठी सज्जावरच उपलब्ध व्हावा व प्रतिदिन तलाठी सज्जावरच राहावा म्हणून लाखो रुपय खर्चुन भव्यदिव्य तलाठी कार्यालयाची इमारत बांधली होती. परंतु या इमारतीचे वर्षानुवर्ष लोकार्पण न होता तलाठी कार्यालयासाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. पण तलाठी कार्यालयात म्हत्वाची कागदपत्र असतात आणी हे कार्यलय आडबाजुला आसल्याने या ठिकाणी शेतक-यांची म्हत्वाची कागदपत्र घायाळ होण्याची संभावना लक्षात घेता या ठिकाणी सज्जावर राहण्यास कुठलाच अधिकारी धजावत नव्हता. आणेक वर्ष तालुक्यावरुनच या सज्जाचा कारभार हाकला जायचा त्या मुळे या इमारतीचा वापर गैर कृत्यासाठी अधिक होत आसल्याने व तलाठी वेळेवर उपलब्ध होत नसल्याची बाब शेतीनिष्ठ शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते शेख खिजर यांच्या लक्षात आल्याने त्यांनी काही शेतकरी सोबत घेऊन शासन व प्रशासनाच्या हे वेळोवेळी लक्षात आणुन दिले शेवटी शेख खिजर व त्यांचे सर्व सहकारी यांच्या प्रयत्णास तुर्तास यश आले असुन या ठिकाणी तलाठी सज्जावर रुजु झाले असून शासकीय तलाठी सज्जाची सध्यस्थिती भूत बंगल्या प्रमाणे झाल्याने नव्याने या ठिकाणी रुजु झालेले तलाठी शेख जावेद यांनी मारवाड़ गल्ली या ठिकाणी भाडे तत्वावर एक रुम तात्पुरत्या स्वरुपात किरायाने घेऊन तलवाडा सज्जा पूर्वत सुरु केल्याने सामाजिक कार्यकर्ते शेख खिजर सौदागर, जयदेव शिंगणे, रमेश नाटकर,सोनु अली,तालेब अली, वैजिनाथ राऊत आणि समीभाई खतीब यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या या वेळी कृष्णा कोकरे, रंजीत शर्मा सह गावकरी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

बीड महाराष्ट्र राज्याचे युवा नेते,संसदरत्न खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

बीड : प्रतिनिधी
युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्या सूचनेनुसार बीड जिल्हा युवासेनेच्या वतीने पाली ता.बीड येथील इन्फंट इंडिया अनाथ आश्रम येथे युवासेनेचे विपुल पिंगळे यांच्या हस्ते अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे,युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे,युवासेना माजी तालुका प्रमुख जगदीश उबाळे पाटील,युवासेनेचे चंद्रसेन काळे पाटील,अतुल कोटुळे यांच्यासह युवासेनेचे अन्य पदाधिकारी,शिवसैनिक उपस्थित होते.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात योग प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिबिराचा समारोप

माजलगाव (प्रतिनिधी)
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने१४ जानेवारी २०२४ ते ४ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान ध्यानधारणा व योग प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिबिर संपन्न झाले.
या शिबिराचे उद्घाटन, दिनांक १४ जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. अरुण दैतकर यांच्या हस्ते तसेच संस्थेचे स्थानिक कार्यवाह ड.विश्वास जोशी,केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे, विद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड ,महाविद्यालय अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथराव जाधव, तसेच प्राचार्य सुहास मोराळे, जायकोवाडी येथील सरपंच राजाभाऊ नवगरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले होते. तर काल दिनांक ४ फेब्रुवारी २०२४ रोजी या शिबिराचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ.युवराज मुळये, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगावकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर, तात्याराम सोंडगे, डॉ.प्रेम राठोड यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या शिबिरात नियमित सकाळी ६ ते ७.३० या वेळेत विद्यार्थीनी ध्यानधारणा व योग प्राणायामाचा सराव केला. गतिमान जीवनातील नेहमीच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये शरीराला ऊर्जा निर्माण करून देण्याचे कार्य ध्यान प्राणायाम व योगासनातून होते शरीरासोबतच मनाचे आरोग्य जपणारे हे व्यायाम प्रकार विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे अत्यंत गरजेचे बनले आहे. याच हेतूने या ध्यान प्राणायाम व योगासन प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिबिराचे आयोजन प्राचार्य सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. उमेश साडेगावकर राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. विकास जाधव(बोरगावकर) डॉ. तात्याराम सोंडगे, डॉ प्रे.म.राठोड यांनी केले होते.

महाराष्ट्र शासन
सहायक निबंधक,सहकारी संस्था,शिरुर का.जि.बीड
इंद्रायणी इमारत,राक्षस भुवन रोड,ता.शिरुर का.जि.बीड-४१३२४९
ईमेल- ar१२३shirur@rediffmail.com, ar१२३shirur@gmail.com

जा.क्र.सनिशि/विकास-२/प्रा.म.यादी/क वर्ग/कार्यक्रम/ २०२४ दि.०६.०२.२०२४

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) (प्रथम सुधारणा) नियम २०१८चे नियम ७५नुसार"क"वर्गात मोडणाऱ्या सहकारी संस्थेची सन २०२३-२४ ते २०२८-२९ या कालावधी करीता होणाऱ्या संचालक मंडळाच्या निवडणुकी करीता.

प्रारूप मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रमाचे जाहीर प्रगटन

खालील संस्थेची प्रारुप मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.
०१.विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म.निमगांव मायंबा,ता.शिरुर का.जि.बीड
०२.धनश्री ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.जांब,ता.शिरुर का.जि.बीड

०२.संस्थेचेनाव	तपशील	दिनांक	वेळ	ठिकाण
०१.विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म.निमगांव मायंबा,ता.शिरुर का.जि.बीड ०२.धनश्री ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था म.जांब, ता.शिरुर का.जि.बीड	प्रारुप मतदार यादी सिध्द करणे.	दि.०६.०२.२०२४	सकाळी ११.वा	संस्थेचे कार्यालय व सहायक निबंधक,सहकारी संस्था,ता.शिरुर का. यांचे कार्यालय
	प्रारुप मतदार यादीवर दावे,आक्षेप व हरकती मागविणे.	दि.०६.०२.२०२४ ते दि.१२.०२.२०२४	कार्यालयीन वेळेत	सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.शिरुर का.जि.बीड यांचे कार्यालयाचा पत्ता :- इंद्रायणी इमारत,राक्षसभुवन रोड, ता.शिरुर का.
	प्राप्त प्रारुप मतदार यादीवरील दावे,आक्षेप व हरकतीवर निर्णय घेणे	दि.१६.०२.२०२४	सकाळी ११.००	
	अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे.	दि.१६.०२.२०२४	सायंकाळी ०५.०० वा.	संस्थेचे कार्यालय व सहायक निबंधक,सहकारी संस्था,ता.शिरुर का.यांचे कार्यालय

टिप:-प्रारुप मतदार यादीवर प्राप्त आक्षेप अर्जावर दि.१३.०२.२०२४ रोजी सकाळी ठिक ११.३० वा.सुनावणी घेण्यात येईल.

(आर.एम.मोटे)
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा
सहायक निबंधक,सहकारी संस्था,ता.शिरुर का

शिवदयाल झंवर यांचे निधन

माजलगाव: माजलगाव येथील व्यापारी बालकिशन झंवर यांचे वडील स्व. शिवदयालजी मांगीलालजी झंवर यांना काल दि. ०४ फेब्रुवारी २४ रोजी सकाळी देवआज्ञा झाली. मृत्यू वेळी त्यांचे वय ८६ होते.राजस्थानी वैकुंठ धाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.
त्यांचा उठावना आज दि. ०६ फेब्रुवारी २०२४ मंगळवार रोजी दुपारी ०३:०० वाजता राहत्या घरी विवेकानंद नगर, माजलगाव येथे होणार आहे.यांच्या पश्चात एक मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

जाहीर प्रगटन
मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४१/ २०२४
ॲड. आर. एस. गोरे यांच्या मार्फत
मंगल व इतर वि. निरंक
ज्यापेक्षा हरिदास पि. रामचंद्र वाघमारे, रा. श्रीराम नगर, बीड, ता.जि. बीड हे दिनांक ०५/०९/२०१६ रोजी विवेकानंद मल्टी हॉस्पीटल, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार
१.मंगल भ्र. हरिदास वाघमारे, वय-७६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. श्रीराम नगर, नगर रोड, बीड, ता. जि बीज
२. रविंद्र पि. हरिदास वाघमारे, वय-३६ वर्षे, धंदा- व्यापार, रा. सदर
३. राजेंद्र पि. हरिदास वाघमारे, वय-४८ वर्षे, धंदा-नोकरी, रा.लाखनगांव, ता.वाशी, जि. उस्मानाबाद
४.जयश्री भ्र. सुरेश दुधाळ, वय-४३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. भवानी पेठ, पाथरूड, ता. भुम, जि.उस्मनाबाद
५. मनिषा भ्र. बाळु झांबरे, वय ३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. पारा, ता, वाशी, जि उस्मानाबाद

अर्जदार क्र. १ ही मयत नामे हरिदास पि. रामचंद्र वाघमारे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. ०२ व ०३ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क्र. ४व ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा /अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना अर्जदारांना सदरहु मयत नामे हरिदास पि. रामचंद्र वाघमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.
प्रकरणाची पुढील तारीख १३/०३/२०२४ ही आहे.
आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

सरपंच सावता ससाणे यांना मातृशोक

आष्टी (प्रतिनिधी)
आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया ग्रामपंचायतचे सरपंच साईनाथ उद्योग समुहाचे अध्यक्ष सावता ससाणे यांच्या मातोश्री श्रीमती सत्यभामा विठ्ठलराव ससाणे (वय ८५) यांचे वृध्दापकाळाने काल निधन झाले.टाकळी अमिया येथे शेतवस्तीवरील वैकुंठधामात अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्यापाठीमागे संजय ससाणे,नारायण ससाणे, शिवाजी ससाणे,सरपंच सावता ससाणे हे चार मुले ,सुना,१० नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यविधीस माजी आ. भीमराव धोंडे, ह.भ.प.संतोष महाराज मोरे,ह.भ.प.दादा महाराज चांगुणे, डॉ.शिवाजी शेंडगे, डॉ. पांडुरंग चौधरी,शिवाजी पाटील चौधरी,संजय धायगुडे,सिध्देश्वर शेंडगे,मारुती भुकन, चंद्रशेखर साके,प्रा.डॉ . बाळासाहेब धोंडे,पत्रकार उत्तम बोडखे,आजीनाथ बेलेकर आदि सामाजिक, राजकीय,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड जिल्हा

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

TUESDAY DT.06 FEBRUARY 2024
मंगळवार,दि.०६ फेब्रुवारी २०२४

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला अल्पसंख्यांक, दलित,आडरापगड समाजाच्या वाढत्या प्रतिसादामुळे भाजपा घाबरली-' अंकित प्रभू

शिवसेनेला बीड जिल्ह्यातील लागलेली कीड संपली येणारा काळ उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याच -गणेश वरेकर

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना मुख्यमंत्री पदी विराजमान सर्वसामान्य शिवसैनिक केल्या शिवाय गप्प बसू शकत नाहीत-किशोर पोतदार

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षा मध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरू झालेली असून माननीय पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्व सर्व मान्य होत असून माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन अल्पसंख्यांक व दलित समाजातील युवकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये प्रवेश केलेला आहे बीड शहरातील नागोबा गल्ली अख्तर नगर नगर गांधीनगर नगर मिलत नगर येथील हजारो युवकांनी दिनांक ४ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये प्रवेश केलेला असून सदरील पक्षप्रवेश सोहळा निमित्त जाहीर सभेचे आयोजन गांधीनगर येथे करण्यात आले होते यावेळी बोलताना शिवसेना युवा सेना नेते माननीय अंकित प्रभू यांनी असे म्हटले की शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ही कोणतीही जात-पात मानत नाही व व कोणालाही जात धर्म बघून पद दिले जात नाही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री माननीय उद्धव साहेब ठाकरे यांना धर्मामध्ये जातीपातीमध्ये तेढ निर्माण करणारे हिंदुत्व नको असून सर्वांना सोबत घेऊन जाणारे हिंदुत्व माननीय उद्धव साहेब ठाकरे हे मानत असून अल्पसंख्याक समाजातील मुस्लिम समाज व दलित समाज यांचा कल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे वाढलेला असून त्यामुळे भाजप व मिंदे हे सरकार घाबरलेले असून त्यामुळेच ते निवडणुका घेत नाही भाजप पक्षामध्ये काम केले नाही प्रवेश घेतला नाही त्यांच्या विरोधात बोलले सत्य

लोकांसमोर आणले तर त्यांना ईडी सीबीआय पोलीस यंत्रणा यांचा दुरुपयोग करून त्यांना परेशान केले जात आहे परंतु येणाऱ्या काळात शिवसेना पक्षाचा भगवा विधान मंडळावर लवकरच फडकेल असा विश्वास त्यांनी मांडला

यावेळी बोलताना सदरील जाहीर सभेचे आयोजक तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख शेख निजाम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की केंद्र व राज्यातील जातीयवादी भाजप व मिंदे गटाच्या सरकारशी फक्त व फक्त श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे हेच कडवी झुंज देत आहेत मोदी व शहा चे सरकार यांनी जाती जाती व धर्मांधर्मामध्ये तेढ निर्माण करून लोकांमध्ये दोष पसरवण्याचे काम करत आहेत देशात व राज्यात झालेल्या या गढूळ वातावरणाला साफ करण्याचे काम

(उर्वरीत पान २ वर)

उमरी कोळी महादेव समाजाच्या वतीने

यशवंत हा.ज्यु.कॉ.चे मुख्याध्यापक बोईनवाड यांचा निरोप समारंभ

उमरी ।प्रतिनिधी

यशवंत हायस्कूल ज्युनिअर कॉलेज येथील लोकप्रिय मुख्याध्यापक श्री दीनानाथ धोंडीबा बोईनवाड यांनी ३५ वर्षे चांगली सेवा करून सेवानिवृत्त झाले आहेत. निरोप समारंभ आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.शिरिषभाऊ देशमुख गोरठेकर यांच्या शुभ हस्ते शाल श्रीफल देवून सत्कार करण्यात आला. सदर,मिळालेल्या सेवेच्या कालावधीत त्या महाविद्यालयात केलेले काम, अनुभव उत्तमोत्तम अभिनव देऊन जातात अशाच एका कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक बोईनवाड सर यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम कोळी महादेव समाजाच्या वतीने दि.४ फेब्रुवारी रोजी कै.गिरीशभाऊ गोरठेकर सांस्कृतिक सभागृह उमरी येथे संपन्न झाला.एक मोठ शैक्षणिक वलय निर्माण झाले की, माणसाचा कार्यक्षेत्र वाढतं कामाचा व्याप वाढतो,अनेक प्रकारचे लोक आपल्याला जोडले जातात. अशा

(उर्वरीत पान २ वर)

पेठ बीड मध्ये शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा झंझावात

अनेक मुस्लिम, बौद्ध समाजाचे तरुण शिवसेनेत दाखल

पेठ बीड भागातील गांधी नगर येथे हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे संपर्क नेते आमदार सुनील प्रभू यांच्या आदेशाने जिल्हा संपर्क प्रमुख किशोर पोतदार, , जिल्हा प्रमुख गणेश वरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, युवा सेना कोअर कमिटी सदस्य अंकित प्रभू, जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हा संघटक नितीन धांडे उपजिल्हा प्रमुख राजू भाऊ महू वाले, रामराजे साळुंके, तालुका प्रमुख गोरख शिंगन, शहर प्रमुख शेख निजाम, युवा सेनेचे गजानन कदम, रवी वाघमारे, यांच्या उपस्थितीत शाखा स्थापना व मेळावा आयोजित करण्यात आला

या कार्यक्रमात रवी वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली सय्यद नय्यूम, अमित जोगदंड, शेख कलीम, बेग राजू, शेख अझहर, गणेश ढोर मारे, हबीब चाऊस, सय्यद अखिल, शेख समीर, सय्यद इद्रिस, पठाण फैजान, शेख इब्राहिम, शेख जहुल हक शेख अकबर यांनी व असंख्य मुस्लिम बौद्ध समाजातील युवकांनी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केलाया कार्यक्रमा ची सुरुवात नागोबा गल्ली येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून मोटार सायकल रॅली गांधीनगर पर्यंत काढण्यात आली मौलाना युनूस कॉलनी व गांधी नगर येथे शाखा स्थापना करण्यात आली व मेळावा

आयोजित करण्यात आलायावेळी बोलताना संपर्क प्रमुख किशोर पोतदार म्हणाले की देशातील आणि राज्यातील विद्यमान मिंधे सरकार व मोदी, शहा सरकार देशातील संविधान पायदळी तुडवून लोकशाही संपवण्याचे षडयंत्र रचत आहे आपल्याला संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी शिवसेनेच्या व पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी खंबीर उभे राहावे लागणार आहे

यावेळी मेळाव्यास मार्गदर्शन करताना युवा सेना कोअर कमिटी सदस्य अंकित प्रभू म्हणाले की राज्यात भाजपाला व मिंधे सरकार मातीत गाडण्यासाठी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे हे सक्षम नेतृत्व असून त्यामुळे

(उर्वरीत पान २ वर)

महाविकास आघाडी स्नेहमिलन मेळावा जामगाव येथे संपन्न

उमरी ।प्रतिनिधी

मा.आमदार वसंतराव पाटील चव्हाण भाऊसाहेब देशमुख गोरठेकर प्रा.युवा नेते रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा स्नेहमिलन कार्यक्रम जामगाव येथे संपन्न. दि. ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी जामगाव येथे महाविकास आघाडीतील चारही घटक पक्षातील प्रमुख नेते, पदाधिकारी व तालुक्यातील कार्यकर्ते यांची स्नेहमिलन हा कार्यक्र मा.आमदार वसंतराव पाटील चव्हाण साहेब यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (पवार गट) तालुकाध्यक्ष भाऊसाहेब देशमुख गोरठेकर हे होते. या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना मा.आमदार वसंतराव पाटील चव्हाण

यांनी म्हटले की चारही पक्षातील नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या विचारांची देवाण-घेवाण व्हावी व एकमेकांची भेट व्हावी आणि येणाऱ्या काळात आपण सर्वजण एकत्रितपणे एका विचाराने काम करूयात व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहू या असे म्हटले व माझ्या कार्यकर्त्यांसाठी मी सदैव तत्पर असेल व त्यांच्या सुखा दुखात, अडीअडचणीत त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा असेल अशी त्यांनी कार्यकर्त्यांना ग्वाही दिली.यावेळी अध्यक्षीय समारोपात बोलताना भाऊसाहेब देशमुख गोरठेकर यांनी म्हटले की यापुढे आपण महाविकास आघाडीचा धर्म एकत्रितपणे पाळून येणारा प्रत्येक निवडणुकीत विजय

(उर्वरीत पान २ वर)

खाकी वर्दीतला वारकरी सहाय्यक पो.नि. सिरसाट मधुर गोड आवाजाने वडवणीकरांना केले मंत्रमुग्ध

संभाजी लांडे ।वडवणी

पोलीस म्हटलं की समाजात वेगळ्या नजरेने पाहिले जाते परंतु पोलिसात सुद्धा चांगले पोलीस अधिकारी व कर्मचारी असतात. असेच गेल्या काही महिन्यापूर्वी वडवणी पोलीस ठाण्याला सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून लाभलेले अमन सिरसाट हे सर्वत्र मिळून मिसळून राहुन त्यांनी आपल्यातील सामान्य पण दाखवून धार्मिक सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहून त्यांनी संपर्क क्षेत्रात त्यांच्यात असलेले कला गुण त्यांच्या गायनातून गोड आवाजातून दाखवून देऊन खाकी वर्दीला वारकरी म्हणून वडवणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसाट यांच्याकडे पाहिले जात आहे. गेल्या काही दिवसापूर्वी वडवणी येथील राम मंदिरात आयोध्या मंदिरात होत असलेल्या श्रीराम मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठाच्या अनुषंगाने आयोजित उत्सव सोहळ्यात जय सिया राम राम जय राधे श्याम हे भजन अत्यंत उत्साहात गोड

वाणीतून गायन करून वडवणीकरांना मंत्रमुग्ध केले. एका पोलीस अधिकाऱ्यांचे हे भजन केल्याने सर्वत्र चर्चा झाली. सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे महाराष्ट्र पोलीसाचे ब्रीदवाक्य आहे. याचा अर्थ असा आहे की, महाराष्ट्र पोलीस सज्जनांचे रक्षण करण्यास आणि दूर्जनांवर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट करण्यास कटीबद्ध आहेत. या वाक्याला साजेशी कामगिरी आणि नि:पक्षपाती न्याय देण्याची कायम भूमिका वडवणी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक (-झख) अमन सिरसाट साहेब हे करत आहेत. पुन्हा काल वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा येथे महादेव महाराज खोटे व ज्ञानेश्वर महाराज खोटे यांच्या शिवशंभो वारकरी शिक्षण संस्थेच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी अमन सिरसाट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी ही शेकडो भाविक भक्त राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणारी मंडळी यांच्यासमोर कानडा राजा पंढरीचा वेदनांही नाही कळला अतपार याचा हे भक्ती गीत अत्यंत उत्साहात गायले व येथील भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. पोलीस अधिकाऱ्यातील वारकरी संप्रदायात असलेले कलागुण व त्यांना धार्मिक क्षेत्राविषयी असलेली गायनाची आवड हे यातून दिसून आले. व पोलीस अधिकाऱ्यांच्या वर्दीतील माणूस अनेकांनी पाहिला असेल पण पोलीस अधिकाऱ्याच्या वर्दीतील संस्कृत खाकी वर्दीतला वारकरी सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसाट यांच्या रूपाने वडवणी तालुक्याला पाहायला मिळाला असून त्यांच्या या गायनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

माजलगाव तहसील कार्यालयातील भ्रष्टाचार थांबवा - भाई ॲड.नारायण गोले पाटील

वारस प्रमाणपत्राचा फेर मंडळ अधिकारी सानप पैशा अभावी करतात नामंजूर

माजलगाव (प्रतिनिधी)

तहसील कार्यालयात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार वाढला असून तहसील कार्यालयातील कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी हे नागरिकाची प्रचंड प्रमाणात लूट करत असून मा. न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्र आधारे फेरफार नोंदवण्यासाठी गंगामसला महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी श्री आप्पासाहेब सानप हे प्रति फेर ५००० रुपयाची मागणी शेतकऱ्यांना करत आहेत, शिवाय पैसे न देणाऱ्याशेतकऱ्यांनी दिलेल्या वारस प्रमाणपत्रा आधारे तलाठी यांनी नोंदवलेला फेर नामंजूर करत आहेत याबाबत

शुक्ल तीर्थ लिमगाव येथील शेतकरी लक्ष्मण आप्पा चव्हाण या शेतकऱ्याने मंडळ अधिकारी श्री सानप यांच्याशी संपर्क केला असता मंडळ अधिकारी सानप यांनी न्यायालयाच्या प्रमाणपत्रा आधारे तलाठी यांनी टाकलेला फेर असला तरी मला काही देणे घेणे नाही असे सांगून जोपर्यंत मला पैसे देत नाही तोपर्यंत फेर ना मंजूरच करत राहणार असे सांगून शेतकऱ्याला अपमानास्पद वागणूक दिली तसेच तहसील कार्यालयातील राशन कार्ड काढण्यासाठी नागरिकाकडून प्रत्येकी पाचशे ते हजार रुपये बळजबरीने वसूल केले जात असून पुरवठा विभागात देखील प्रचंड प्रमाणात राशन धारकासह नागरिकांची लूट केली जात आहे याबाबत तहसीलदार यांना कार्यवाही करण्याची वारंवार विनंती करून देखील तहसीलदार यांनी आज पर्यंत तहसील कार्यालयातील कर्मचारी मंडळ अधिकारी यांच्यावर कुठलीही कार्यवाही केलेली नाही शिवाय तहसील कार्यालयात भ्रष्ट कर्मचारी व अधिकाऱ्यांना पैसे घेण्यासाठी अडचण होऊ नये या कारणामुळे कार्यालयात सीसीटीव्ही न लावता तहसीलच्या आवारात सीसीटीव्ही

(उर्वरीत पान २ वर)

मोहनराव जगताप यांच्या हस्ते ५१ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामाचे उद्घाटन

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव तालुक्यातील नाकलगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत ५१ लक्ष रुपयांच्या कामाचे उद्घाटन भाजपा विधानसभा निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमंत आप्पा शिनगारे, प्रमुख पाहुणे शरद यादव, गावचे सरपंच मारुती विटेकर, उपसरपंच रमेशराव झोडगे व ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य गावातील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. या कार्यक्रमा प्रसंगी

(उर्वरीत पान २ वर)

माजलगाव मध्ये शनिवारी संवाद हृदयापासून हृदयापर्यंतच्या कार्यक्रमाचे आयोजन

यशवंत हॉस्पिटल, रोटरी क्लब व गुरुकुपा इन्स्टिट्यूटचा संयुक्त उपक्रम

माजलगाव (प्रतिनिधी)

बदलती जीवन शैली,बदलत्या खानपान सवयीमुळे जगभरात हृदयरोगाचे प्रमाण वाढले असून त्यावर शंका समाधान शोधण्यासाठी माजलगावमध्ये रोटरी क्लब सेंट्रल व यशवंत हॉस्पिटल यांचे संयुक्त विद्यमाने 'संवाद हृदयापासून हृदयापर्यंत' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी दि १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४:०० वाजता केशवराज मंगल कार्यालय याठिकाणी हा संवादरूपी कार्यक्रम होत आहे.

यशवंत हॉस्पिटलचे संचालक डॉ.यशवंत राजेभोसले,रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष इम्रान नाईक, सचिव सुनिल शिंदे यांनी या उपक्रमाची पत्रकार परिषदेत माहिती दिली. याप्रसंगी बाजार

समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.यशवंत राजेभोसले म्हणाले, वेळेचे कोलमडलेले गणित, त्याबरोबरच व्यस्त जीवनमानात वाढता ताणतणाव, तरुण वर्गात व्यायामाचा अभाव सोबत जंकफूडचे व्यसन, निद्रानाश इत्यादी कारणाने आजकाल तिशी चाळीशीमध्येच प्रमाण वाढले आहे. अशा परिस्थितीत हृदयरोगाबद्दल शंका समाधान व समाजात हृदयविकार संबंधी जागरूकता व्हावी, या उद्देशाने 'संवाद हृदयापर्यंत हृदयापासून' या परिसंवादाचे

(उर्वरीत पान २ वर)

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com